● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ४२ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

yuva.aadarsh@gmail.com RNI: MAHMAR/2019/78282

# युवा आदर्श

https://www.facebook.com/yuvaaadarshnews/
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो. ८३९००९८८८६ रविवार, दि १ सप्टेंबर २०२४ https://yuvaadarsh.com

# गुटखा बंदीची जिल्ह्यात नौटंकी; विक्री जोमात

## गुटखा पुडी चौका-चौकात, गल्ली-बोळात सहज उपलब्ध; अन्न व औषधी प्रशासनासह पोलीसांची भुमिका संशयाचा भोवऱ्यात

**दीपक शेळके**

**जालना -** राज्यात जुलै २०१२ पासून गुटखा बंदी आहे. असे असले तरी जालना शहर व परिसरातील चौका-चौकात व गल्ली बोळातील पान टपऱ्या व दुकानांवर गुटखा उपलब्ध आहे. अन्न व औषधी प्रशासनासह पोलीस प्रशासनावर या बंदीच्या अंमलबजावणीची जबाबदारी असतांनाही गुटखा सर्रास विकल्या जात असल्याने त्यांच्या भुमिकेवर संशय निमर्ण होत असून जालन्यात गुटखा बंदीची नौटंकी सुरु असून बंदी असलेला गुटखा विक्री जोमात सुरु आहे.

केंद्र सरकारने २०११ मध्ये तंबाखू व निकोटीन याची कुठल्याही प्रकारे अन्न पदार्थात मिसळ केल्यास गुन्हा ठरणार असल्याचे अन्न व सुरक्षा कायद्यात नमूद केले होते. त्यानंतर देशातील काही राज्यांनी गुटख्यावर बंदी घातली होती.

महाराष्ट्र राज्यात २० जुलै २०१२ रोजी गुटखा बंदीचा निर्णय झाला. त्याला आज बारा वर्षांपेक्षा अधिकचा काळ लोटला आहे. जुलै २०१२ पासून गुटखा आणि पान मसाला उत्पादन, विक्री आणि वितरणावर बंदी आणली. या कायद्यातील तरतुदीनुसार गुटख्याचे उत्पादन, जाहिरात आणि विक्री करणे हा गुन्हा ठरविण्यात आला. पण ना त्याची कडक अंमलबजावणी झाली ना गुटखा विक्री थांबली शेजारच्या राज्यातून खुष्कीच्या मार्गाने विविध वाहनांचा वापर करुन गुटखा विक्रीसाठी महाराष्ट्रात आणला जातो. जालना शहर व जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात गुटखा येतो आहे. गुटखा बंदीनंतर अनेकांनी मावा-गुटखा विक्रीचा नवा व्यवसाय सुरु केल्याची स्थिती आहे.

जालना शहरातील भोकरदन नाका परिसरात असलेल्या पान टपऱ्यांवर तर बेदिक्कत गुटखा विक्री सुरु असून या व्यवसायिकांना अन्न व औषधी प्रशासनासह पोलीसांचा धाक नसल्याचे चित्र आहे. याच ठिकाणाहून एक घाऊक गुटखा विक्रेता जिल्ह्यासह व जिल्ह्याबाहेरही गुटखा विक्री करतो. अनाधिकृत पणे सांगतांना हा गुटखा विक्रेता पोलीसांना भरणा भरवा लागतो. तेव्हा कुठे व्यवस्थीत सुरु असल्याचे सांगतो. ऐन पोलीस चौकीच्या आसपास होणाऱ्या ही गुटखा विक्री व गुटख्याची होलसेल उलाढाल होत असल्याचे



आश्चर्य आहे.

तरुणांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी व निरोगी, सदृढ समाज निर्मितीसाठी हातभट्टी दारू, गुटखा, मावा विक्रीवर कडक निर्बंध घातलेले आहेत. पण शासकीय यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे त्याचे पालन होत नाही. काही भ्रष्ट अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या आश्रयात हे अवैध व्यवसाय सुरु असतात.

एका सर्वेक्षणानुसार, कर्करोगाने मृत्यू पावलेल्या रुग्णांमध्ये तंबाखूसेवन करणाऱ्या ५५ टक्के नागरिकांचा समावेश असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळेच बंदी आणण्यात आली आहे. पान मसाला, तंबाखूजन्य पदार्थ हे अन्न या सदरात मोडत असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केल्यामुळे गुटखाबंदी राबविण्याची जबाबदारी महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनावर सोपविण्यात आली होती. गुटखा बंदीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ५ फेब्रुवारी २०२० रोजी उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पोलीसांनाही कारवाई करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले. असे असले तरी अन्न व औषधी प्रशासन असो अथवा पोलसी प्रशासन असो यांच्याकडुन कारवाया होत असल्या तरी गुटखा उपलब्धतेमुळे त्यांच्या कारवाईच्या भुमिकेवर संशय निर्माण होत आहे. युवकांच्या सदृढ व निरोगी आरोग्यासाठी प्रशासनाने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

देशात २७ कोटी लोक गुटख्याचे सेवन करतात, असे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या एका अहवालात नमूद आहे. एका सर्वेक्षणानुसार, देशातील गुटखा सेवनाचे प्रमाण २० ते २५ टक्के असून गुजरातमध्ये सर्वाधिक (३३ टक्के), त्या खालोखाल ओडिसा (३१ टक्के), मध्य प्रदेश (२९.६ टक्के), उत्तर प्रदेश (२७.६ टक्के) या राज्यांचा क्रमांक लागतो. देशात १९ कोटी लोक गुटखा सेवन तर नऊ कोटी लोक तंबाखू सेवन करतात. अनधिकृत माहितीनुसार, भारतातील पान मसाला विक्रीची आर्थिक उलाढाल ४२ हजार कोटींच्या घरात आहे. २०२७ मध्ये तो आकडा ५३ हजार कोटींवर पोहोचेल, असा विश्वास या उद्योग जगताचा आहे.

### गुटखा विक्रेत्यांना अभय कुणाचे?

**प्रशासनातील काही भ्रष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांमुळे गुटखा शहर व परिसरात उपलब्ध होत आहे. असे असले तरी या अधिकारी व गुटखा व्यापाऱ्यांमध्ये समेट घडवून आणणारे ते दलाल नेमके कोण? ते कोणत्या क्षेत्रातील? असे प्रश्न उपस्थित होत असून या संदर्भातील माहितीही लवकरच पुढे आणण्यासाठी युवा आदर्श प्रयत्नशील आहेच.**

# मतदातसंघात जेथलिया यांच्या माध्यमातून काँग्रेसमय वातावरण

## नागरी सत्कार कार्यक्रमात खा. कल्याणराव काळे यांनी व्यक्त केला विश्वास

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर - मंठा मतदार संघात मा.आ. सुरेशकुमार जेथलिया यांच्या माध्यमातून काँग्रस चे प्रचंड वातावरण असून येणाऱ्या निवडणुकीत काँग्रेसचाच आमदार असेल असे प्रतिपादन जालना जिल्ह्याचे काँग्रेसचे खासदार कल्याण काळे यांनी केले.

माजी आ. सुरेश जेथलिया यांच्या नेतृत्वात परतूर-मंठा-नेर सेवली काँग्रेस कमिटीच्या वतीने आष्टी या ठिकाणी आयोजित नागरी सत्कार व प्रवेश सोहळा निमित्त ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जालना जिल्हा प्रभारी मा.आ. नामदेवराव पवार, आ.कैलास गोरंटयाल, जिल्हा अध्यक्ष राजेभाऊ देशमुख, राजेंद्र राख, शेख महेमूद, प्रभाकर पवार, बालासाहेब आकात, किसनराव मोरे, पांडू आबा सोळंके, अण्णासाहेब खंदारे, बाबाजी गाडगे, शामसुंदर काळे, सुभाष मगरे, बद्रीभाऊ खवणे, एजाज जमीनदार, इंद्रजीत घनवट, हाजी रहेमत खान, शाखेर मापेगावकर, जगन लाटे, सुखलाल राठोड, संतोष दिंडे, दादाराव खोसे, योगेश पा. अवचार, सूर्यभान मोरे, मंजुळदास सोळंके, परमेश्वर सोळंके, पांडुरंग कुरधने, आणिकराव डवले, सुरेशजिजा सवने, सिद्धेश्वर अंभुरे, विकास खुळे, पंजाबराव देशमुख, सादेक जाहगिरदार, अजीम कुरेशी, मोसिन जमीनदार, आसेफ जमीनदार, मोईन कुरेशी, शबाब कुरेशी, सारिका वरणकर, सौ. खाडे उपस्तिथ होते.



सत्काराला उत्तर देतांना खा.काळे यांनी म्हणाले कि गेली १० वर्ष जेथलिया आणि मी पराभवाला सामोरे गलो आहे मात्र न खचता तितक्याच जोम्याने पक्षाशी एक निष्ठ राहत आम्ही दोघांनीही आपल्या आपल्या कार्यक्षेत्रात पक्ष चळवळ मोठ्या प्रमाणात उभारली व कार्यकर्त्यांना सांभाळत आपले कार्य चालूच ठेवले त्याचेप्रती फळ मला जसे लोकसभा निवळणुकीत मिळाले तसेच जेथलिया यांना येणार्या विधानसभा निवडणुकीत मिळणार असून ते आमदार म्हणून ते पुन्हा आपल्या सेवेत राहतील असा विश्वास त्यांनी पान २ वर

# शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा क्षेत्रात प्रगती



**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** शैक्षणिक गुणवत्तेबरोबर क्रीडा क्षेत्रातही दुर्गामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे घवघवी यश भोकरदन तालुक्यातील दुर्गामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सोयगाव देवी येथील खेळाडू तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत १७ वयोगटातील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला तसेच १७ वयोगटातील मुलीच्या संघाने सुद्धा प्रथम क्रमांक मिळवला व १४ वयोगटातील मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळून विद्यालयाचे नाव उज्वल केले या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी सभापती एल के दळवी, पान २ वर

# कबड्डी व मैदानी क्रीडा स्पर्धेच्या तारखेत बदल

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक प्राचार्य व मुख्याध्यापक क्रीडा शिक्षक मार्गदर्शक यांना विनंती करण्यात येते की शालेय सर्व गट कबड्डी स्पर्धा व मुले मुली मैदानी स्पर्धा मुले मुली यांच्या क्रीडा स्पर्धेच्या तारखेत खालील प्रमाणे बदल करण्यात आलेल्या आहेत याची नोंद घ्यावी

४ सप्टेंबर -: १४ वर्ष मुले मुली जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा खासगाव येथे होणार आहे व ६ सप्टेंबर १७ वर्ष मुले व मुली स्पर्धा स्वामी विवेकानंद विद्यालय बुटखेडा येथे होणार आहे तसेच ९ सप्टेंबर क्रॉस कंट्री स्पर्धा सिद्धार्थ महाविद्यालय व १० सप्टेंबर १९ वर्षा आतील मुले व मुली कबड्डी स्पर्धा सिद्धार्थ महाविद्यालय पान २ वर

# अवैधरीत्या गावठी पिस्टल बाळगणारा एक जण जेरबंद

## चंदनझिरा पोलिसांची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** अवैधरीत्या गावठी पिस्टल बाळगणाऱ्या एकास चंदनझिरा पोलिसांनी जेरबंद केलय. प्रेम गायकवाड असं संशयित आरोपीचं नाव आहे. जालन्याच्या पाटणी फॉर्म शेजारी सिध्दीविनायक कमानिजवळ एक जण त्याच्या जवळ गावठी पिस्टल बाळगून असल्याची माहिती चंदनझिरा पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी सदर ठिकाणी जावुन प्रेम गायकवाड या सांशयिताची अंग झडती घेतली असता त्याच्या जवळ पोलिसांना अवैधरित्या बळगलेली गावठी पिस्टल मिळाली. पोलिसांनी सदर व्यक्तीस ताब्यात घेऊन त्याच्या जवळील पिस्टल जप्त केलीय.

शुक्रवार (दि ३०) रोजी संध्याकाळी ०८.०० वा सुमारास पोलीस निरीक्षक श्री सम्राटसिंग राजपुत यांचे आदेशाने पोउपनि सचिन सानप पोहेकॉ देशमुख पोहेकॉ राजेंद्र पवार हे पट्रोलींग करत असतांना पोउपनि सानप यांना गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम पाटनी फॉर्म शेजारी सिध्दीविनायक कमानिजवळ जालना येथे प्रेम गायकवाड नावाचा इसम पिवळे टि शर्ट व जिन्स पॅन्ट वर उभा असुन त्याचे जवळ गावठी पिस्टल असल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी जावुन नमुद वर्णनाच्या इसमास ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव प्रेम बबन गायकवाड वय-२८ वर्षे रा. शिवनगर घाटी रोड जालना असे असल्याचे सांगीतले तेंव्हा त्यास छापा कार्यवाहीचा उद्देश कळवुन त्याची पान २ वर

## महिला आर्थिक विकास महामंडळाचे महिला बचत गटांना ५८ कोटी रुपयाचे कर्ज वितरित

# गटांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी आग्रही - आमदार लोणीकर

**जालना । प्रतिनिधी -** भारताची वाटचाल विकसित देशाकडे सुरू असून २०४७ पर्यंत आपल्याला हे लक्ष्य गाठावयाचे आहे. हे लक्ष्य साधताना देशातील प्रत्येक महिलेच्या सुरक्षिततेसोबतच आर्थिक सक्षमीकरणासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. महिलांच्या सर्वांगीण प्रगतीमुळे आपण विकसित भारताचे ध्येय नक्कीच गाठू, स्वयंसहायता गटाला आर्थिक ताकद देतानाच गरीबांसाठी घरकूल बांधण्याच्या कामाला गती देण्यात आली आहे. आतापर्यंत महाराष्ट्र राज्यात चार कोटी घरकूल वाटप करण्यात आली असून परतूर विधानसभा मतदार संघात अठरा हजार घरकुल बांधकामास मंजुरी देण्यात आली आहे. आगामी काळात महाराष्ट्र राज्यात ३ कोटी घरे बांधण्यात येतील. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

मोरंगेश्वर मंगल कार्यालय आष्टी ता. परतुर जि. जालना येथे सावित्रीबाई फुले लोकसंचलित साधन केंद्र, आष्टी संचलित मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण आभियान अंतर्गत महिला व बाल विकास विभाग महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) जालना अंतर्गत महिलांपर्यंत शासनाच्या विविध योजनांची माहिती व जाणिव जागृती आभियान वार्षिक सर्वसाधारण सभा, उत्तकृष्ट कार्य करणाऱ्या बचतगट / महिलांना गौरव सोहळा आणी महिलांची आरोग्य तपासणी शिबीर महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. तळणी विभागातील ४५० बचत गटात ५३०० महिला असून मंठा विभागातील ३१२ बचत गटात ३२०० महिला आहे. राष्ट्रीय भागातील ३०४ बचत गटात ३५१० महिला तर परतूर विभागातील ४५३ बचत गटात चार हजार सहाशे महिला आहेत. अशा एकूण परतूर विधानसभा मतदारसंघात मंठा व परतूर तालुक्यातील १५१९ महिला बचत गटात एकूण सोळा हजार सहाशे महिला असून तळणी विभागाला १२ कोटी मंठा विभागात आठ कोटी आष्टी विभाग १३ कोटी परतुर विभाग १७ कोटी असे एकूण ५० कोटी रुपये पान २ वर



# मराठा सेवा संघ चिरायू होवो!

मराठा सेवा संघ ही संस्था शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर यांनी १९९० साली स्थापन केली. या संस्थेच्या मार्फत संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, जगतगुरू तुकोबाराय साहित्य परिषद, शहीद भगतसिंग विद्यार्थी परिषद असे ३३ कक्ष चालविले जातात. या संस्थेने समाजात प्रबोधन करून १२ जानेवारी रोजी जगातील सतरावा शिवधर्म स्थापन केला. विज्ञानावर आधारित मानवतावादी मुल्यांची जपणूक करणारा हा धर्म आहे. सेवा संघाच्या वतीने सिंदखेड राजा येथे दरवर्षी जिजाऊ जन्मोत्सव साजरा केला जातो. शिवधर्म स्थापनेला १४लाख बहुजन मराठा शिवभक्त उपस्थित होते. आपण माणसातल्या माणुसकी धर्माप्रती बांधिलकी जपणाऱ्या शिवधर्माचे सेवक आहोत. शिवसाधक हा कुठल्याही बंधनात अडकवला जाऊ शकत नाही. मराठा सेवा संघ हा शब्द वाचला की, अनेकांना प्रश्न पडतो, ही नेमकी कोणती संस्था आहे? त्याचे काय काम आहे? त्याच्या माहितीविषयी हा थोडासाच प्रयत्न. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा महत्त्वपूर्ण लेख अभ्यासा...

दि.१ सप्टेंबर १९९० रोजी बहुजन समाजांतील सर्व घटकांनी विरोध, द्वेष सोडून एकत्र यावं या उदात्त हेतुने ॲड.पुरुषोत्तम खेडेकर यांनी इतिहासाचा सखोल अभ्यास आणि चिंतन करून मराठा सेवा संघाची स्थापना अकोला येथे केली. मराठा सेवा संघ व त्याअंतर्गत ३३ कक्षांच्या माध्यमातून सर्व मराठा समाजाच्या अथक परिश्रमामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरोगामी विचारांचे सशक्त व राष्ट्रनिर्मितीकरिता बलशाली संघटन म्हणून मराठा सेवा संघ सर्वांना सुपरिचित झाला आहे. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे शेकडो वर्षांपासून पुरुषसंस्कृती असतांनासुद्धा मराठा सेवा संघाने संपूर्ण देशाला अभिमान वाटावा असा मातृतिर्थ सिंडखेडराजा येथे मांसाहेब जिजाऊंच्या जन्मस्थळी जिजाऊ सृष्टीचा भव्यदिव्य प्रकल्प हाती घेतला आणि अत्यंत जलद गतीने हा प्रकल्प पूर्णही होत आहे. संपूर्ण जगाला हेवा वाटावा असा हा प्रकल्प, खरेच हा मातृसत्तेचा गौरव, सन्मान मराठा सेवा संघच करू शकतो. मातृशक्तीचा प्रत्यक्ष कृतीतून सन्मान करणारं जगातील एकमेव संघटन म्हणजे मराठा सेवा संघ!

सन १९९६पासून मराठा सेवा संघ ही पुरोगामी विचारधारेची ढाल आणि विकृतीवर आक्रमकपणे घणाघाती वार करणारी तीक्ष्ण तलवार अशी ओळख धारण करणारी संस्था आहे. खरंतर मराठा सेवा संघाने नेमकं कोणतं कार्य केलं? हा प्रश्न महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तींना कधीच पडत नाही. परंतु समाजातील धार्मिक आणि जातीय द्वेष पसरविणाऱ्या विघातक प्रवृत्तींनी सर्वसामान्य लोकांपर्यंत मराठा सेवा संघ आणि त्याचे वास्तविक विचार पोहोचू नयेत म्हणून त्याविषयीची बदनामीची मोहीम राबवली, जो अपप्रचार केला,जे चुकीचे चित्र समाजासमोर उभे केले, ज्यामुळे सर्वसामान्य लोकांना मराठा सेवा संघाचे मुख्य उद्देश आणि भरीव कार्य याविषयी प्रश्न पडणे साहजिक आहे. ही माहिती वाचून थोडी जरी भर पडली तर या लेखप्रपंचामागील हेतू सफल झाला, असे म्हणता येईल.

मराठा सेवा संघाचे कार्ये; महाराष्ट्राच्या सामाजिक भुमीची नव्याने मशागत केली, सर्वांना जय जिजाऊ, जय शिवराय!, एक मराठा, लाख मराठा!, अशी आपुलकीची घोषवाक्य दिली. राष्ट्रमाता जिजाऊंच्या नावाला जय जिजाऊ! असे अभिवादनमुल्य प्राप्त करून देवून लाखो लोकांना एकत्र आणले; पूर्वी राष्ट्रमाता जिजाऊंचे कोणताच चित्र, फोटो उपलब्ध नव्हते, त्यांचे तैलचित्र बनवून ते अधिकृत करून राज्याच्या मंत्रालयात लावून घेतले. विधानसभेत शिवजयंतीच्या तारखेच्या वादावर चर्चा घडवून १९ फेब्रुवारी ही शिवजयंतीची अधिकृत तारीख निश्चित करून घेतली आणि वादावर कायमचा पडदा पाडला. १२ जानेवारी हा मांसाहेब जिजाऊंचा राष्ट्रीय जन्मोत्सव दिन जाहीर केला. सन १९९०पूर्वी हा दिवस इतिहासजमा झाला होता. परंतु जिजाऊंच्या जन्मगावी सिंदखेडराजा येथे खेडेकर साहेबांनी जिजाऊ जन्मोत्सवाचा प्रारंभ केला आणि आज खेडोपाडी हा दिवस राष्ट्रीय सण म्हणून युवक, युवती आबालवृद्ध मोठ्या उत्साहात साजरा करताना दिसतात.

मांसाहेबांवर लेखन केले जात आहे. त्यांच्या चरित्राचे विविध पैलू विचारवंत आपल्या भाषणातून लेखातून उलगडून समाजापुढे ठेवू लागले आहेत. जिजाऊ ब्रिगेडच्या महिलांचा उत्साह १२ जानेवारी जिजाऊ जन्मोत्सव दिनी अत्युच्च बिंदूवर शिगेला पोहोचत असतो. मराठा समाजाला त्यानिमित्ताने एका नव्या सांस्कृतिक पर्वाचा लाभ झालेला आहे. सिंदखेडराजा या बुलडाण्यातील जिजाऊंच्या जन्मगावी लाखाहून अधिक लोक शेकडो गाड्यांतून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून जय जिजाऊ, जय शिवराय! असा उद्घोष, ऐतिहासिक स्फूर्तिदायक पोवाड्यांचे गायन हे सारे काही मन उल्हासीत, प्रफुल्लित करणारे असते. १९ फेब्रुवारी- शिवजयंती किल्ले शिवनेरी, १४ मे- शंभुजयंती किल्ले पुरंदर, ६ जून- शिवराज्याभिषेक किल्ले रायगड हे उत्सव सुरू केले. २९ ऑगस्ट हा दिवस महाराष्ट्रात शेतकरी दिन म्हणून साजरा करण्यासाठी शासननाकडे यशस्वी पाठपुरावा केला. पानिपतच्या युद्धातून वाचलेले रोड मराठा आणि महाराष्ट्रातील मराठा बांधवांचा मराठा मिलन समारोह घडवून आणला. धार्मिक, विद्वेषातून दगडं उचलणाऱ्या युवकांच्या हातात वैचारिक पुस्तकं दिली आणि महाराष्ट्रातील जातीय सलोखा वाढविला. इतिहासाच्या पुनर्लेखनाची चळवळ उभारून इतिहासाचे विकृतीकरण करणाऱ्यावर दहशत बसविली. महापुरुषांचे विचार घराघरापर्यंत घेऊन जाणाऱ्या लेखक, कवी, शाहीर, कलाकारांची मोठी फळी तयार केली. समाजाला आपल्या पूर्वजांच्या शौर्याची जाणीव करून दिली. लेखकांना वाचकवर्ग, वक्त्यांना श्रोतावर्ग, कलाकारांना प्रेक्षकवर्ग आणि अख्ख्या महाराष्ट्राला वैचारिक वर्ग प्राप्त करून दिला. धार्मिक गोष्टींचा विचार करता धर्माचार्य उदात्त विचार सांगणारी शिवधर्म गाथा दिली. आपली नाणी, वाणी, गाणी, लेखणी आणि करणी आपण आपल्याच लोकांविरोधात वापरू नये, ही आचारसंहिता दिली. युवकांना बुटांच्या पॉलिशपासून डोक्याच्या मालिशपर्यंत कोणताही व्यवसाय करण्याची मुभा व दृष्टीही दिली. धर्मसत्ता, राजसत्ता, शिक्षणसत्ता, अर्थसत्ता, प्रचार-प्रसारमाध्यमसत्ता, यांचे महत्त्व समाजाला पटवून दिले. अज्ञात, अंधश्रद्धा, अहंकार, आणि न्यूनगंड ही समाजाच्या अधोगतीची कारणे आहेत याची सर्वांना जाणीव करून दिली. समाजातील सांस्कृतिक दहशतवाद संपवण्यासाठी समाजाला सांस्कृतिक वारसा आणि बुद्ध, तुकोबा, शिवराय, शाहू, फुले, आंबेडकर ही साखळी समजावून सांगितली. मराठा सेवा संघाचे कार्य प्रत्यक्षात जितके दिसून येते तितकेच अप्रत्यक्ष महाराष्ट्रातील सर्व समाजघटकांवर मराठा सेवा संघाच्या चळवळीचा प्रभाव पडला आहे. जे अनेक युवक वेगवेगळ्या विषयांवर निर्भीडपणे व्यक्त होतात, त्यासाठी मराठा सेवा संघाचे खूप मोठा आधार मिळत आला आहे. मराठा सेवा संघ स्थापन दिन चिरायु होवो !!

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

## गणेशोत्सवात लेझर दिव्यांवर बंदी; डिजे वाजणार!

**नाशिक -** गणेश विसर्जन मिरवणुकीत प्रखर दिव्यांच्या लेझर किरणांमुळे काही भक्तांच्या डोळ्यांना इजा झाल्याचे गतवर्षी उघड झाल्याने यंदाच्या गणेशोत्सवात या दिव्यांना पूर्णतः प्रतिबंध करण्याचे शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री दादा भुसे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत नाशिक महानगर गणेशोत्सव महामंडळाने मान्य केले. गणेश मंडळांना ध्वनी प्रदूषणासंबंधीच्या नियमांचे पालन करून आवाजाच्या भिंती (डीजे) उभारण्यास मुभा देण्यात आली. तसेच महानगरपालिकेकडून आकारल्या जाणाऱ्या मंडप शुल्कात आणि परवानगी शुल्कात सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत आमदार सीमा हिरे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर आणि विविध गणेश मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी गणेशोत्सव - २०२३ वर्षीच्या सर्वोत्कृष्ट मंडळांना पारितोषिकाने गौरविण्यात आले. बैठकीतील चर्चेची माहिती पालकमंत्री भुसे यांनी दिली.

गेल्या वर्षी विसर्जन मिरवणुकीत अनेक मंडळांकडून लेझर किरणांचा वापर केला गेला. त्यामुळे मिरवणूक पाहण्यासाठी आलेल्या आणि सहभागी झालेल्या भक्तांच्या डोळ्यांना इजा झाली होती. काहींच्या दृष्टीवर परिणाम झाला होता. या पार्श्वभूमीवर, लेझर दिव्यांविषयी चर्चा झाली. नाशिक महानगर गणेशोत्सव महामंडळाचे अध्यक्ष समीर शेट्ये यांनी या दिव्यांच्या वापरास पूर्णतः बंदी आणण्याचे मान्य केल्याचे भुसे यांनी सांगितले. ध्वनिप्रदूषणविषयक नियमांचे प्रत्येकाला पालन करावे लागेल. मर्यादित डेसिबल, जेणेकरून प्रदूषण होणार नाही, नियमांचे पालन करून कुठलेही वाद्य वाजविण्यास परवानगी दिली जाईल, असे भुसे यांनी सांगितले. गणेश मंडळांकडून मंडप उभारणीसाठी शुल्क आकारले जाते. नाशिकपुरते मंडप शुल्कात सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच परवानगी शुल्कातही सवलत देण्यात आली. पावसात शहरातील बहुतांश रस्ते खड्डेमय झाले असून त्यांची दुरुस्ती तातडीने करण्याची सूचना महापालिकेला करण्यात आली. मागच्या वर्षी म्हणजेच २०२३ गणेशोत्सव स्पर्धेत परिमंडळ एकमधील वेलकम सहकार्य मित्रमंडळ, कैलास मित्र मंडळ, अण्णासाहेब मुरकुटे मित्र मंडळ, परिमंडळ दोनमध्ये राजा सार्वजनिक गणेशोत्सव समिती, शिव कपालेश्वर युवा प्रतिष्ठान, एकता संस्था मंडळ, कपालेश्वरचा राजा मित्र मंडळ आदींना रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. विसर्जन मिरवणूक दामोदर चित्रपटगृहापासून पुढे जाण्यास विलंब होतो, मिरवणुकीला वेळ वाढवून द्यावा, वीज जोडणीसाठी अनामत रक्कम, विजेचा लपंडाव कमी करणे, रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, मिरवणुकीत स्वागत कक्ष एकाच बाजूला ठेवणे, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था, रात्रीच्या वेळी गणेश मंडपांना संरक्षण, गणेशोत्सवात काँक्रिटीकरणाची कामे थांबविणे, वाहतुकीचे नियमन आदी सूचना गणेश मंडळांकडून करण्यात आल्या.

पान १ वरुन

## मतदार संघात ..

व्यक्त केला.तसेच महायुती प्रशासनावर चौफेर टीका करत महाविकास आघाडी ला विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.जिल्हा निरीक्षक मा.आ.नामदेवराव पवार यांनी महायुती सरकारच्या भ्रष्टाचाराचे वाभाडे काढत राजगढ येथील छत्रपती शिवारायांच्या पुतळ्याच्या बांधकामात देखील ह्यांनी भ्रष्टाचार करण्याचे सोडले नसल्याचे म्हणाले. व अशीच निकृष्ट दर्ज्यांची कामे संपूर्ण राज्यात चालू असून संपूर्ण महाराष्ट्राची वाट लावली असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले तसेच आपल्या मनोगतात जालना जिल्हा काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष राजेभाऊ देशमुख म्हणाले की जेथलिया यांनी पक्षाशी एक निष्ठ राहत मतदारसंघात पक्ष संघटन बळकट केले असून विरोधी बाकावर असतांना देखील कार्यकर्त्यांचे मनोबल न खचू देता जेथलिया यांनी एक सक्षम नेता म्हणून आपला परिचय दिलेला आहे आणि या मुळेच काँग्रेस पक्ष आपला मतदारसंघ कदापि सोडणार नसल्याची त्यांनी ग्वाही दिली. कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन करत काँग्रेस चे भविष्य उज्वल असल्याचे ते म्हणाले यावेळी जेथलिया यांनी उपस्थित कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त करत म्हणाले कि सत्तेत नसतांनाही कार्यकर्त्यांनी कुणाच्याही अमिशाला बळी न पडता माझी कधीच साथ सोडली नाही उलट प्रचंड प्रमाणात आज मतदारसंघाचे भाजप पक्षाचे मातब्बर कार्यकर्ते काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहे. हा पक्षासह एक प्रकारे माझ्यावर टाकलेला विश्वास असून ह्याला मी कधीच तडा जाऊ देणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली.भविष्यात याच कार्यकर्त्यांना स्वतः च्या पाया वर उभा करत पक्षाला देखील चांगले दिवस आणल्या शिवाय मी स्वस्थ बसणार नाही असे म्हणत मला तुम्ही साथ द्या अशी अंतर हाक त्यांनी मारली या वेळी अनेकांनी आपल्या मनोगतात कार्यकार्त्यंना कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी केले या वेळी मा.आ.सुरेश जेथलिया यांच्या नेतृत्वात विश्वास ठेऊन भाजप जिल्हा उपध्यक्ष सिद्धेश्वर पाटील सोळंके,प्रफुल्ल आबा शिंदे,शेख हबीब,कादिर भाई,राजेंद्र राठोड, अनिल जाधव, जगन्नाथ आढे यांच्यासह लिखिल पिंप्री व अकोली येथील ३५ वर्ष जुने सहकारी अशोकराव देशमुख यांचे चिरंजीव अमर देशमुख व मालघन कुटुंबातील प्रमुख तसेच प्रकाशनाना सोळंके यांच्या सह शेकडो समर्थकांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.पक्ष प्रवेशाची यादी इतकी मोठी होती कि काही समर्थक सत्कारा पासून वंचित राहिले यामुळे युवा नेते नितीन जेथलिया यांनी सर्वांचे शाब्दिक सत्कार करून दिलगिरी व्यक्त केली.

या कार्यक्रमाची जय्यत तयारी आष्टी येथील कार्यकर्त्यान मार्फत चालू होती.नागरी सत्कारमूर्ती खा.कल्याण काळे यांचे आगमन होताच फटाक्यांच्या अतिशबाजीने आष्टी परिसर दणाणून गेला युवा नेते नितीन जेथलिया व सिद्धेश्वर सोळंके यांच्या नेतृत्वा खाली निघालेल्या मोटारसाईकल रॅलीला प्रचंड प्रतिसाद देत शेकडो कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला होता व खा.कल्याण काळे यांना वाजत गाजत शहरातून कार्यक्रम स्थळा पर्यंत रॅलीच्या माध्यमातून आणतांना जागोजागी उत्साही कार्यकर्त्यांनी खा.कल्याण काळे सह मा.आ. सुरेश जेथलिया यांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन जेथलिया यांनी केले तर आभार युवा नेते तारेख सिद्धीकी यांनी व्यक्त केले.

## शैक्षणिक गुणवत्ता ...

माजी सरपंच सौ कासाबाई लक्ष्मणराव पाटील दळवी, प्राध्यापिका गीताताई गावंडे, योगेश पाटील दळवी, दिनेश पाटील दळवी संस्थेचे प्रशासकीय प्रमुख आनंद वाघसर, विद्यालयाचे प्राचार्य डी बी बोर्डे सर तसेच क्रीडा शिक्षक कैलास दळवी सर नितीन राठोड सर तसेच तालुका क्रीडा संयोजक कृष्णा पाटील जंजाळ पाटील सर किरण साळवे ,अजय मतकर यांनी खेळाडूचे अभिनंदन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## कबड्डी व मैदानी ...

जाफराबाद व १९ सप्टेंबर मैदानी १४ १७ १९ या वर्षातील मुले मुली स्पर्धा वरुड बुद्रुक कोनड रोड येथे संपन्न होणार आहे याची नोंद घेण्याचे आवाहन केले असून कबड्डीचे वजन ९ - ३० ला होईल व खेळाडूचे ऑनलाईन फॉर्म काढून घ्यावे असे प्राध्यापक वाहेद पटेल( तालुका क्रीडा संयोजक जाफराबाद जिल्हा जालना यांनी कळवले आहे.

## अवैधरित्या गावठी ...

पंचा समक्ष अंग झडती घेतली त्याचे कमरेला गावठी पिस्टल मॅग्झीनसह मिळुन आले. सदर पिस्टल जागीच पंचनामा करुन पोउपनि सानप यांनी जप्त करुन पोस्टे चंदनझिरा येथे दिलेल्या फिर्यादी वरुन सदर प्रकरणात गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोहेकॉ जारवाल हे करत आहेत.

ही कार्यवाही पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, मा.अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपानी उप विभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी साहेब यांचे मागदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सम्राटसिंग राजपुत, पोलीस उप निरीक्षक सचिन सानप, पोहेकॉ देशमुख पोहेकॉ राजेंद्र पवार यांनी केली असुन प्रकरणी तपास सुरु आहे.

## गटांना कर्ज ...

कर्ज या आर्थिक वर्षात वाटप झाले असून आज महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते अष्टविभागातील महिला बचत गटांना आज १३ कोटी रुपये कर्ज वाटप करण्यात आले. याप्रसंगी बचत गटांच्या उपस्थित हजारो महिलांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या प्रसंगी गणेश महाराज शत्रूघन कणसे संपत टकले रवी सोळंके सुदाम प्रधान तुकाराम सोळंके प्रदीप ढवळे सिद्धेश्वर केकाण बाबाराव थोरात मधुकर मोरे विष्णूकाका शहाणे अमोल जोशी जिजा शिंदे बाळासाहेब लहाने गणेश सोळंके रावसाहेब आढे आण्णासाहेब ढवळे कृष्णा टेकाळे नसरूल्लला काकड रमेश थोरात उमेश सोळंके मारोती थोरात रफिक भाई आसिफ कच्छी छत्रपती थोरात नागेश ढवळे सुरेश जगताप अमोल पवार उपविभागीय अधिकारी गायकवाड तहसीलदार प्रतिभा गोरे गटविकास अधिकारी पंचायत समिती परतूर तांगडे, अग्रनी बँक व्यवस्थापक प्रेषित मोघे, जिल्हा जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक नाबार्ड जालना तेजस क्षीरसागर जिल्हा उद्योग केंद्राची जगदीश जगताप जिल्हा समन्वय अधिकारी उमेश कहाते व्यवस्थापक श्रीमती सुषमा कुलकर्णी कार्यकारी संचालक मंडळाच्या जाईबाई धोंडीबा मोरे मंदाकिनी गरीबदास डोळस प्रेमला शिवाजी तौर शोभा बाबुराव शेळके संगीता विश्वम्भर चौघुले शालनबाई बाबुराव मोटे रेखा अनिस मोरे विजयमाला कालिदास मोरे लक्ष्मी नामदेव देवकर शोभा पंडित ढवळे गोदावरी प्रभाकर सोळंके केसर राजेभाऊ वाहुळे ग्रीष्म हनुमान वक्ते मनीषा शेषराव लहाने सुदामती जालींदर बाण विजयमाला विनायक शिंदे विमल लक्ष्मण भांडवले चिंगुबाई सिताराम विमल भीमराव गायकवाड छाया अंबादास शिंदे संगीता राधाकिसन खरात सुनीता अशोक वालेकर पुष्पा प्रकाश सोळंके नाणी आबासाहेब अहवाल मनीषा सोळंके कमाल माणिक भागडे उर्मिला वसंत जगताप शितल आंधळे सागर बबन रोडे यांच्यासह महिला बचत गटातील हजारो महिलांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेबाबत पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की बालसंगोपन योजनेचा मुख्य उद्देश महाराष्ट्र राज्यातील अनाथ, निराश्रित, निराधार, बेघर, संरक्षण व निवाऱ्याची गरज असलेल्या ० ते १८ वयोगटातील मुलं मुलींना संस्थेत दाखल करण्याऐवजी पर्यायी कुटूंब उपलब्ध करुन देणे व संस्थेतील वातावरणाऐवजी कौटुंबिक वातावरणात त्यांचे संगोपन व विकास घडवून आणणे हा आहे.

सदर योजना ही संस्थाबाहय योजना असून या योजनेअंतर्गत ० ते १८ वयोगटातील मुलामुलींना थेट संगोपनाकरिता महाराष्ट्र राज्य सरकार प्रती माह प्रती लाभार्थी दोन हजार दोनशे रुपये यवढे अर्थसहाय्य देते. अनाथ, निराधार, निराश्रित, बेघर, दुर्धर आजारी पालकांची मुले, कैद्यांची मुले या योजनेचा लाभ घेतात. प्रत्यक्ष जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयातील अधिकारी अथवा स्वयंसेवी संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते हे गृहचौकशी करुन संबंधित बाल कल्याण समितीस अहवाल सादर करतात. त्या अहवालाच्या आधारे बाल कल्याण समितीकडून दाखल आदेश घेवून लाभार्थ्यांस जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे मार्फत बालसंगोपन या योजनेचा लाभ देण्यात येतो. शासन निर्णयान्वये बालसंगोपन योजनेचे नाव बदलून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना असे करण्यात आले आहे.

या योजने चा लाभ परतूर विधानसभा मतदारसंघातील मंठा परतूर जालना तालुक्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने लवकरच अनाथ बालक पालक मेळाव्याचे आयोजन आपण करत आहोत.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने बाबत पुढे बोलतांना आमदार लोणीकर म्हणाले की मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' ही अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि क्रांतिकारी योजना आहे. ही योजना लाडक्या बहिणींसाठी कायमस्वरुपी सुरु राहणार आहे. या आर्थिक वर्षात योजनेसाठी ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्याची आर्थिक स्थिती जसजशी मजबूत होत जाईल तसे सद्यस्थितीत असणारी दरमहा दीड हजार रुपयांची रक्कम वाढवत जावून टप्या-टप्याने ही रक्कम तीन हजार रुपयांपर्यंत करण्यात येणार असून ही योजना काहीही झाल तरी बंद पडणार नाही. त्या करीता राज्यात पुन्हा महायुती च सरकार सत्तेत असणं गरजेच आहे.

## जालना गणेश फेस्टिवलचे अध्यक्ष राजेंद्र गोरे यांचा जालन्याचे खासदार काळे, माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर व आमदार कैलास गोरंट्याल यांच्याकडून सत्कार





जालना गणेश फेस्टिवल अध्यक्ष राजेंद्र गोरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांचा जालन्याचे खासदार कल्याणराव काळे, माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर, आमदार कैलास गोरंट्याल यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले काँग्रेसचे शहर जिल्हा अध्यक्ष शेख महमूद, शरद देशमुख, सुरेश मुळे, सतीष देशमुख, सुभाषराव कोळकर, राजेंद्र भोसले, किरण गरड, राजेंद्र राख, अशोक आगलावे, चंद्रशेखर वाळिंबे, कपिल भुरेवाल, अतिक खान, संतोष माधवाले, किरण शिरसाट, योगेश रत्नपारखे, सागर पाटील आदींची उपस्थिती होती.

# मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात

## यज्ञेश उभारे याचा दुर्दैवी मृत्यू; माणगावात शोककळा

**बोरघर । माणगाव -** मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर दररोज अपघाताची मालिका सुरूच आहे. शुक्रवार दिनांक ३० ऑगस्ट २०२४ रोजी रात्री १० वाजता माणगाव रेल्वे स्थानका समोर मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर मिनी टेम्पो आणि बुलेट यांच्यात झालेल्या भिषण अपघातात माणगाव पंचायत समिती चे माजी सभापती मा. प्रभाकर दादा उभारे यांचे चिरंजीव कुमार यज्ञेश प्रभाकर उभारे या अवघ्या बावीस वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला.

कु. यज्ञेश प्रभाकर उभारे हा शुक्रवारी रात्री १० च्या सुमारास इंदापूर कडून माणगाव च्या दिशेने येत असताना मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर माणगाव रेल्वे स्थानकासमोर आला असता माणगाव शहरा कडून मुंबई च्या दिशेने येणाऱ्या मिनी टेम्पो चा आणि कु. यज्ञेश उभारे चालवत असलेल्या बुलेट चा भिषण अपघात झाला. सदर अपघात इतका भिषण होता की, कु. यज्ञेश ची बुलेट समोरून येणाऱ्या मिनी टेम्पो ची उजवी बाजू तोडून आत घुसली गेली. आणि यज्ञेश चा जागीच मृत्यू झाला.

सदर अपघातास मुख्यत्वे करून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रखडलेल्या कामामुळे त्याची झालेली दयनीय अवस्था , अत्यल्प साईडपट्टी, महामार्गाच्या बाजूला माणगाव रेल्वे स्थानका समोर सुरू असलेले काम आणि त्या कामामुळे महामार्गालगत झालेले चिखलाचे साम्राज्य आणि तिथे जोशी वडापाव शेजारी समोर लावलेल्या प्रखर प्रकाश झोताच्या एलईडी लाईट्स यामुळे इथून येजा करणार्या वाहनचालकांच्या डोळ्यावर सदर ठिकाणी लावण्यात आलेल्या प्रखर लाईट्स चा प्रकाश पडतो आणि समोर चे वाहन नीटसे दिसून येत नाही.






त्यामुळे या ठिकाणी अपघात होतात.

सदर मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाचे तब्बल सतरा वर्षे रखडलेल्या कामामुळे या महामार्गावर सर्वत्र जीवघेणे खड्डे, महामार्गाची झालेली चाळण, खचलेल्या साईडपट्टी, यामुळे या महामार्गावर झालेल्या वेगवेगळ्या ठिकाणच्या अपघातात आजवर सुमारे तीन हजारांहून जास्त लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. कित्येक कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. या महामार्गावर अनेकांना कायमचे अपंगत्व झाले आहे. तर कित्येक लोक जखमी झाले आहेत.

सदर महामार्गाची दुरावस्था आणि रखडलेले काम युद्धपातळीवर करण्यासाठी गेली अनेक वर्षे रायगड प्रेस क्लब च्या माध्यमातून अनेक प्रकारची आंदोलने केली, निवेदनं दिली, नुकतेच मुंबई गोवा महामार्ग जन आक्रोश समिती च्या माध्यमातून आमरण उपोषण करण्यात आले. दोन दिवसांपूर्वी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांनी या महामार्गाचा पाहणी दौरा केला आणि सदर महामार्ग आगामी गणेशोत्सवा पूर्वी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अत्यंत शीघ्र गतीने निर्माण केला जाईल असे आश्वासन दिले. अशी आश्वासने अनेकदा अनेक नेत्यांनी, लोकप्रतिनिधींनी या आधी सुद्धा दिली होती, परंतू प्रत्यक्षात मात्र काही झाले नाही. केवळ गणेशोत्सव तोंडावर आला की आमच्या कोकणवासीयांना या महामार्गाची आठवण येते आणि आमच्या लोकप्रतिनिधींना देखील तेव्हाच जनतेची दिशाभूल करणारी आश्वासने देण्याची नौटंकी सुचते. गणेशोत्सव तोंडावर आला की या महामार्गावर तात्पुरती मलमपट्टी करून जनतेच्या डोळ्यात धूळफेक केली जाते. बाकी कायमस्वरूपी असे काही नाही. निर्ढावलेल्या सरकारी यंत्रणेला या महामार्गावर असून किती निष्पाप लोकांचे बळी घ्यायचे आहेत.

सदर निष्क्रिय शासन, प्रशासन आणि सरकारी यंत्रणेच्या बेजबाबदार वृत्तीमुळे माणगाव मधील कुमार यज्ञेश प्रभाकर उभारे या अवघ्या बावीस वर्षीय निष्पाप तरुणाला आपला अनमोल जीव गमवावा लागला. यज्ञेश प्रभाकर उभारे हा तरुण नुकतेच विधी महाविद्यालयातून एल एल बी झाला होता. त्याला आपल्या जन्म दात्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी त्याने अहोरात्र कायद्याचा अभ्यास करून तो एक उदयोन्मुख वकील झाला होता. पुढे त्याला निष्णात विधीज्ञ होऊन आपले करीअर घडवायचे होते. परंतू येथील निष्क्रिय यंत्रणेने त्याचे हे स्वप्न कायमचे हिरावून घेतले. यज्ञेश च्या अशा अकाली जाण्या मुळे त्याच्या जन्म दात्या आई वडिलांवर व समस्त उभारे कुटुंबियांवर, नातेवाईकांवर, त्याच्या मित्र परिवारावर, आणि तमाम माणगाव करांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. शनिवारी दुपारी त्याच्या पार्थिवावर माणगाव स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या दुःखद समयी माणगाव तालुक्यातील अफाट जनसागर उपस्थित होता.

# महादिप संवाद चाचणी स्पर्धेत शिंगोणा शाळेच्या विद्यार्थीचे यश



**परतूर । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद प्रा शाळा शिंगणा येथे दि.३०, ऑगस्ट २०२४, रोजी महादीप संवाद अंतर्गत केंद्रस्तरीय चाचणीचे आयोजन करण्यात आले होते.

या चाचणीसाठी परतूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्रा शाळांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये शिगोणा, हातडी, वलखेड, शेवगा, या चार शाळेनी गंज केंद्रातून सहभाग नोंदविला. जिल्हा परिषद प्रा शाळा शिंगोणा येथे केंद्रस्तरीय महादीप संवाद ही स्पर्धा केंद्रप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली होती.

स्पर्धेत शिंगोणा शाळेच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले ऋतुजा सोळंके. अनुष्का सोळंके.पायल गरड. विनायक कदम.खुशी गरड. हे विद्यार्थी केंद्र स्तरातून तालुका स्तरावर चाचणीसाठी पात्र झाले. सदरील चाचणीमध्ये ५ वी ते ८ वी वर्गातून गुणानुक्रमे प्रत्येक वर्गातून ३ विद्यार्थी तालुकास्तरीय चाचणीसाठी निवड करण्यात आली. गेल्या तीन वर्षा अगोदर जिल्हा परिषद प्रा शिंगोणा शाळेच्या विद्यार्थ्यांनी मालदीप संवाद चाचणी स्पर्धेत यश प्राप्त करून सहलीला जाण्याचा मान मिळविला होता. यावेळी चाचणी केंद्र प्रमुख बाबासाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा पार पडली.हि चाचणी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी आर. एम. सावंत. डी. आर.लहाने.श्रीमती, अमृता सोईतकर. कैलास पाईकराव. कैलास उफाड.श्रीमती, मनीषा मुंडे.यांनी विशेष प्रयत्न केले.

# जिल्हा सामान्य रुग्णालयात राष्ट्रीय पोषक आहार सप्ताहाचे उदघाटन



**जालना । प्रतिनिधी -** येथील जिल्हा सामान्य रुग्णालय येथे दि.३१ शनिवार रोजी दुपारी २ वा. च्या सुमारास राष्ट्रीय पोषक आहार सप्ताहचे उदघाटन थाटात संपन्न झाले. आरोग्य हे औषधी घेण्यापेक्षा सकस संतुलित पोषक आहार, नियमित व्यायाम, योगा, ध्यान व सकारात्मक आचार विचार याने वृंधिगत होत असते त्या करिता प्रत्येक व्यक्तीने अभ्यासपूर्ण जीवनसत्व युक्त आहार घ्यावा असे आवाहन उदघाटक अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजेंद्र गाडेकर यांनी केले. याप्रसंगी नर्सिंग विद्यार्थ्यांनी आहाराबाबत प्रदर्शन व मार्गदर्शन केले.

यावेळी आहारातद्य श्रीमती जोशी, उप प्राचार्य किरण जाधव, मेट्रोन गायकवाड, प्रमुख पाहुणे श्री बोर्डे, ताहेर डॉक्टर्स, नर्स, अधिकारी, कर्मचारी शिक्षक, विद्यार्थी, रुग्ण व त्यांचे नातेवाईक आदींची उपस्थिती होती.

# शिंदे गटाचे जालना युवासेना शहरप्रमुख अब्दुल सगीर यांचा राजीनामा

## रामगिरी महाराजांच्या वक्तव्याचा मुख्यमंत्र्यांनी समर्थन केल्याचा ठेवला ठपका

**जालना । प्रतिनिधी -** मुस्लिम धर्माचे प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या बद्दल बेताल वक्तव्य करणारे रामगिरी महाराज यांना समर्थन केल्याने पक्षाचे प्रमुख महाराष्ट्रचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुस्लिमांच्या धार्मिक भावना दुखावल्याने शिवसेने चे जालना युवासेना शहर प्रमुख अब्दुल सगीर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

जगाला शांतीचे संदेश देणारे प्रेषित पैगंबर यांच्याबाबत रामगिरी महाराज यांनी अतिशय बेताल वक्तव्य केल्याने मुस्लिमांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या परिणामी मुस्लीम समाजाच्या वतीने ठिक ठिकाणी रामगिरी महारांजाच्या विरोधात रोष व्यक्त करण्यात येत आहे. महाराष्ट्रात अनेक शहरामध्ये धरणे, मोर्चे, आंदोलने काढण्यात येत आहेत. अशातच ज्या रामगिरी महाराजाने पैगंबर विषयी अपशब्द वापरले त्यांना पक्षाचे प्रमुख व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांनी त्यांच्या मंचावर जाऊन पाठिंबा दिल्याने या पक्षात राहण्यास योग्य वाटत नसल्याने शिवसेनेचे जालना युवासेना शहरप्रमुख अब्दुल सगीर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

अब्दुल सगीर हे मागील काही वर्षांपासून शिवसेनेत शिंदे गटाचे पदाधिकारी म्हणून कार्यरत होते. शिवसेना नेते अर्जूनराव खोतकर यांचे ते खंदे समर्थक म्हणून ओळखल्या जायचे. पक्षासाठी त्यांनी भरीव कामगिरी केलेली आहे. विशेष म्हणजे मुस्लीम समाजाला तसेच तरूणांना शिंदेंच्या शिवसेना पक्षासोबत जोडण्याचे काम त्यांनी मोठ्या कुशलतेने केलेले होते. परंतु नुकतेच रामगिरी महाराजांनी इस्लाम आणि पैगंबर बद्दल नको ते वक्तव्य केल्याने इस्लाम धर्मासह पैगंबराची अवहेलना झाली असल्याने शगीर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

यावेळी माध्यमांशी बोलताना अब्दूल सगीर म्हणाले की, अख्ख्या



जगातील मुस्लीम समाज आपल्या पैगंबर विषयी अपशब्द खपवून घेत नाही. अशा परिस्थितीमध्ये यापुढे शिंदे सेनेच्या पदावर राहणे शक्य नसल्याचे सांगत युवासेना जालना शहरप्रमुख पदावर राहणे शक्य नसल्याने आपण आपल्या पदाचा राजीनामा देत असल्याचे सगीर म्हणाले. पुढे बोलताना ते म्हणाले की, या प्रकरणाचे सोशल मिडियावर जे काही आरोप प्रत्यारोप होत आहेत. ते करू नये कारण प्रेषित पैगंबर हे राजकारणाचा विषय नसून कोणीही या विषयावर राजकारण न करता आपआपल्या परिने निषेध नोंदवावा असे अवाहन त्यांनी केले.

# कुमार सानू आणि कमल चोप्रा यांचा रोमँटिक म्युजिक अल्बम चांदनी लाँच

कुमार सानू आणि कमल चोप्रा यांचा रोमँटिक म्युझिक व्हिडिओ चांदनी रिलीज झाला आहे, व्हिडिओमध्ये दिग्गज गायक खूपच डॅशिंग दिसत आहे. मेलोडी किंग कुमार सानू ९० च्या दशकातील मधुर गाण्यांसह दीर्घ काळानंतर पुनरागमन करत आहे. चांदनी या रोमँटिक ट्रॅकमध्ये कमल चोप्राचा सुंदर आवाज आहे. विशेष बाब म्हणजे या व्हिडिओमध्ये कमल चोप्रासोबत कुमार सानू देखील दिसत आहे. मुंबईत या गाण्याच्या लाँच प्रसंगी कुमार सानू, कमल चोप्रा, संगीतकार अरविंदर रैना-मृदुल, गीतकार शहाब अलाहाबादी-अंजन सागरी, निर्माते डॉ.सुनील चोप्रा, दिग्दर्शक फिलिप, होस्ट मिहिर जोशी आणि क्रिएटिव्ह डायरेक्टर तनवीर आलम, सुबोध निमलेकर, शेखर सावंत, मुनाफ पटेल, इसरार खान, माणिक बत्रा उपस्थित होते.

चांदनीचा म्युझिक व्हिडिओ अतिशय सौंदर्य आणि भव्यतेने शूट करण्यात आला आहे. कुमार सानू, कमल चोप्रा यांच्यासोबत, माही चौधरी आणि शुभम शर्मा या मॉडेल्सनेही व्हिडिओमध्ये आपली मोहिनी दाखवली आहे. व्हिडिओच्या एका खास भागामध्ये संगीतकार अरविंदर रैनाची झलकही पाहायला मिळते. पाहिले तर चांदनी हा खूप सुंदर व्हिडिओ आहे. ९० च्या दशकातील संगीतप्रेमींनाच नाही तर आजच्या तरुण पिढीलाही हे गाणे खूप मोहक वाटत आहे.

कुमार सानू चांदनी गाण्याबद्दल खूप उत्साही आणि समाधानी होते आणि म्हणाले की मला खूप आनंद होत आहे की आजच्या काळात असे गाणे आणले गेले आहे जे ९० च्या दशकातील गाण्याची आठवण करून देते. शहाब अलाहाबादी यांनी त्याचे शब्द अतिशय काव्यात्मक शैलीत लिहिले आहेत तर त्याचे संगीत अतिशय मधुर आहे. कमल चोप्राने ते सुंदर गायले आहे. मी नवीन गायक आणि संगीतकारांसोबत काम करण्यास सहमत आहे कारण त्यांच्यात नवीनता आणि उत्साह आहे. कमलने व्हिडिओमध्ये खूप छान काम केले आहे. मॉडेल्सनीही आपल्या अभिनयाने प्रभावित केले आहे. मी निर्माते डॉ. सुनील चोप्रा यांचे आभार मानू इच्छितो ज्यांनी चांदनीसारखे मधुर गाणे तयार केले. माझी गाणी यायला हवीत अशी माझ्या चाहत्यांकडून मागणी आहे, त्यामुळे मी आता दर ८-१० दिवसांनी माझ्या चाहत्यांसाठी एक नवीन आणि मधुर गाणे आणायचे ठरवले आहे.

एवढ्या मोठ्या बॉलीवूड गायक कुमार सानूसोबत हे गाणे मिळणे हे माझ्यासाठी एक स्वप्न पूर्ण झाल्यासारखे वाटत असल्याचे कमल चोप्रा यांनी सांगितले. तो माझा आवडता गायक आहे. मी माझा टोन ९० च्या दशकातील टोनसारखा ठेवला. तसेच व्हिडीओमध्ये अभिनय आणि अभिव्यक्तीसाठी बरीच तयारी केली. आम्ही हे गाणे अतिशय सुंदर पद्धतीने सादर केले आहे जे संगीतप्रेमींना नक्कीच आवडेल.

संगीतकार अरविंदर रैना म्हणाले की कुमार सानूसाठी ९० च्या दशकासारखे गाणे तयार करणे हे एक आव्हानात्मक काम होते परंतु शब्द इतके सुंदर लिहिले होते की आम्हाला ट्यून तयार करण्यात आनंद झाला. सानू दा यांनी गाऊन त्याला नवी उंची दिली आहे. कमलच्या आवाजात खूप टिंगल आणि जादुई मोहिनी आहे, मला वाटतं ती बॉलिवूडची पार्श्वगायिका होण्याच्या प्रवासात पुढे जात आहे.

गीतकार शहाब अलाहाबादी म्हणाले की, कुमार सानूचा आवाज असा आहे की, प्रत्येक गाणे वर्षानुवर्षे आणि शतकानुशतके अमर राहते. चांदनी हा एक असा शब्द आहे ज्यावर याआधी बरेच काही लिहिले आणि गायले गेले आहे. गाण्यात ९० चा फ्लेवर ठेवावा लागणार असल्याने त्यानुसार गाण्याचे बोल लिहिले गेले. गाण्याचे बोल, ट्यून आणि व्हिडिओ हे सर्व एक परिपूर्ण आयकॉनिक व्हिडिओ म्हणून समोर आले आहेत.

शहाब अलाहाबादी आणि धछठ जीळसळपरश्री द्वारे प्रस्तुत, चांदनीमध्ये संगीतकार अरविंदर रैना - मृदुल, गीतकार अंजन सागरी, शहाब अलाहाबादी, दिग्दर्शक फिलिप, क्रिएटिव्ह डायरेक्टर तनवीर आलम आहेत. या गाण्याचे चित्रीकरण मुंबई आणि चंदीगडमध्ये झाले आहे. हे गाणे यलो आणि रेड म्युझिक लेबलवर रिलीज करण्यात आले आहे. या गाण्याचे लाँचिंग मिहिर जोशी यांनी केले.

# जिंतूर येथील शेकडो मुस्लीम समाजातील मतदारांना निवडणूक विभागाची नोटीस; नागरीकांमध्ये संभ्रम



**जालना । प्रतिनिधी -** जिंतूर तहसील कार्यालयाच्या निवडणूक विभागाच्या वतीने ३० ऑगस्ट रोजी तहसील कार्यालयात उपस्थित राहून मतदार असल्याचा पुरावा द्यावा अशी नोटीस दोन दिवसांपूर्वी मुस्लीम समाजातीन अनेक मतदारांना देण्यात आली होती. नियम १९ (ख) (दोन) नुसार मुस्लीम समाजातील अनेक मतदारांविरोधात हरकती,आक्षेप घेण्यात आला आहे.

दिलेल्या नोटीसी मध्ये नमूद करण्यात आले की, हरकती घेण्यात आलेल्या मतदारांनी जिंतूर येथील तहसील कार्यालयातील सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार, जिंतूर यांच्या समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे, स्वतः वेळेवर ऊपस्थित न राहिल्यास आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून प्रकरण गुणवत्तेनुसार निकाली काढण्यात येईल असे दिलेल्या नोटीस मध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे तहसील कार्यालयात मुस्लीम मतदारांची गर्दी होती! मुस्लिम समाजातील बहुतांश मतदारांना नोटिसा मिळाल्याने मुस्लिम समाजातील ८० वर्षांच्या महिला-पुरूष मतदारांमध्ये संतापाची लाट उसळली. जिंतूरचे सर्व मुस्लीम मतदार ४० ते ५० वर्षांपासून प्रत्येक निवडणूकीत मतदान करत आहेत! मग अचानक या आगामी विधानसभा निवडणुकीत हे बहुसंख्य मुस्लिम मतदार बोगस कसे झाले? असा प्रश्न मुस्लीम समाजाच्या मतदारांकडून विचारला जात आहे? जिंतूर तहसील कार्यालयातील निवडणूक विभाग कोणाच्या दबावाखाली काम करत आहे? असा प्रश्न मुस्लिम समाजातून उपस्थित होत आहे. मागील ३५ ते ४० वर्षांपासून जिंतूर मतदारसंघातील मुस्लीम समाजाने निवडणूकीत मतदान केले तेव्हा ते मुस्लिम मतदार मूळ होते. मग यावेळेस असे काय झाले आहे की अचानक मुस्लिम मतदार बोगस झाले? जिंतूर मतदारसंघात हे द्वेषाचे राजकारण कोण करतंय? जिंतूर तहसील कार्यालयाच्या निवडणूक विभागाने आपले मत कोणाला द्यायचे हा अधिकार हिरावून घेऊ नये असे मुस्लिम समाजातील उच्चशिक्षित बुद्धीजीवी नागरिकांचे म्हणणे आहे.

ज्या लोकांनी मुस्लीम समाजातील नागरीकांना मुद्दामहून टार्गेट कृरून आक्षेप नोंदवला त्यांची सखोल चौकशी करावी जेणे करून कोणत्या आधारावर या लोकांनी केवळ मुस्लीम मतदारांना टार्गेट केले याची शहानिशा व्हायला पाहिजे असे स्थानिक नागरीकांची मागणी आहे.

## राज्य गणेशोत्सव स्पर्धेचे अर्ज स्वीकारण्यास ५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**जालना । प्रतिनिधी** - महाराष्ट्र शासनाच्या पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या वतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४' चे आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांना स्पर्धेत सहभागी होता यावं यासाठी अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ५ सप्टेंबर २०२४ करण्यात आली आहे. गणेशोत्सव मंडळांनी संपूर्ण भरलेला अर्ज ारहेीीर्रीं. श्रिवरसारळश्र.लो या ई-मेल आय. डी. वर पाठवणे आवश्यक आहे.

स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. स्पर्धेचा अर्ज पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून स्पर्धा नि:शुल्क आहे. सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट ,ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल.

७ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे ४ जिल्हे प्रत्येकी ३ आणि हे ४ जिल्हे वगळता अन्य ३२ अशा प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण ४४ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील.

राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख आणि १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना रु. २५,000/- रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन शासनातर्फे करण्यात आले आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

## जेईएस महाविद्यालच्या ललित कला अकादमीचे उदघाटन

### पंडीत विश्वनाथ दाशरथे यांच्या संगीत मैफीलीने जालनेकर मंत्रमुग्ध

**जालना । प्रतिनिधी -** येथील जेईएस महाविद्यालच्या ललित कला अकादमीचे उदघाटन सुप्रसिद्ध ज्येष्ठ गायक पंडीत विश्वनाथ ओक आणि विश्वनाथ दाशरथे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या प्रसंगी पंडीत विश्वनाथ दाशरथे यांच्या संगीत मैफीलीने जालनेकर रसिकांना मंत्रमुग्ध केले.

शहरातील जेईएस महाविद्यालयात आयोजित जेईएस ललित कला अकादमीचा उदघाटन समारंभ आणि संगीत मैफीलीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया हे होते. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, गायक पंडित विश्वनाथ ओक, पंडीत विश्वनाथ दाशरथे, डॉ. मोहिनी रायबागकर, मराठी विभागाचे प्रमुख तथा समन्वयक डॉ. यशवंत सोनुने, लोककला विभागाचे प्रमुख प्रा. कल्याण उगले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी ललित कला अकादमी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करेल. आजच्या युवकांच्या मनामनात संगीत,नाट्य नृत्याची आवड

निर्माण व्हावी. त्यांना जीवनात चांगल्या गोष्टीचा छंद असेल तर



सकारात्मक ऊर्जा निर्माण व्हावी यासाठी सांस्कृतिक वातावरण देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न ललित कला अकादमीच्या माध्यमातून होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्या उद्घाटनपर भाषणात पंडीत विश्वनाथ ओक म्हणाले की , की पूर्वीच्या काळी संगीताला राजाश्रय होता. परंतु आता परिस्थिती बदलली असल्याचे सांगून संगीत हे आत्मीय आनंदासाठी असायला हवे. संगीत विषयाचा अभ्यास करण्यापेक्षा 'रियाज' असायला पाहिजे, असेही श्री. ओक यांनी सांगितले.

यावेळी बोलताना पंडित विश्वनाथ दाशरथे म्हणाले की, ललित कला अकादमीतून शिकत असताना स्व घरी सेवक, गुरु घरी साधक आणि रंगमचावर कलाकार म्हणून रहावे. गुरुचा विश्वास जपत समर्पण भावना मनात नव्याने शिकत असताना जोपासता आली पाहिजे.

संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया आपल्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी म्हणाले, की लोककला आणि ललित कला अकादमीच्या माध्यमातून युवकांना एक हक्काचे व्यासपीठ निर्माण व्हावे, यासाठी सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देईल.

पं. विश्वनाथ दाशरथे यांनी आपल्या सुमधुर गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी सुरुवातीला राग दुर्गा सादर केला. विलंबित एकताल आणि दृत एकतालाची बंदिश गाऊन त्यांनी दुर्गा राग नटवला. त्यानंतर मंदारमाला नाटकातील 'सोहम हर डमरू बाजे' हे सुरेख असे नाट्यगीत सादर केले.भैरवी रागातील सुंदर असे भजन गाऊन संगीत मैफिलीची सांगता झाली. या मैफिलीत रसिक मंत्रमुग्ध झाले होते. कार्यक्रमाला संवादिनीवर श्री. दिनेश सन्यासी यांनी साथ केली तर श्री. जय कराड यांनी तबल्यावर साथ दिली.

या संगीत मैफिलीस शहरातील संगीत रसिकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधवी माळी- उगले यांनी केले तर डॉ. मोहिनी रायबागकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.